**भूखंडाचा विकास करताना गौण खनिजाच्या उत्खननाबाबत परवानगी देण्याबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.गौखनि-१०/०७२६/प्र.क्र.१९८/ख-२/ई-१७४१३७९**
पहिल मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- ०९ जुलै, २०२६

संदर्भ : १. खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७
२. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३
३. महसूल व वन विभाग, शा.प.क्र.गौखनि-१०/११२१/प्र.क्र.२९२/ख-२, दि.०९.०५.२०२३

**प्रस्तावना:-**

खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम,१९५७ च्या कलम १५(१)(३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ तयार करण्यात आले आहेत. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ४६ मधील तरतूद विचारात घेवून नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम किंवा भूखंड विकासाची परवानगी मिळाल्यानंतर पाया खोदकाम (Foundation) करताना निघणाऱ्या माती, दगड, मुरुम इत्यादी गौण खनिजाच्या स्वामित्वधन आकारणीबाबत संदर्भाधीन क्रमांक ०३, दिनांक ०९.०५.२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये भूखंडाचा विकास करताना गौण खनिजाच्या उत्खननाच्या अनुषंगाने भूखंडाच्या क्षेत्रफळानुसार काल्पनिक टक्केवारी धरून स्वामित्वधनाची आकारणी निश्चित करण्यात येवून त्याप्रमाणे स्वामित्वधन आकारण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले होते. त्यानुषंगाने क्षेत्रीय यंत्रणेकडून कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शासन परिपत्रकाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून होणारी संभाव्य दंडात्मक कारवाई व त्यातून न्यायालयीन वाद उद्भवत आहेत. संदर्भाधीन क्रमांक ०३, दिनांक ०९.०५.२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतूदीमुळे मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाने विविध याचिकांमध्ये दिलेल्या न्यायनिर्णयाशी विसंगत असल्याचे व त्यामुळे विकासक/बांधकाम व्यावसायिक यांच्याकडून मोठ्या प्रमाणात कायदेशीर आव्हाने उभी राहत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. ही बाब विचारात घेवून दिनांक ०९.०५.२०२३ रोजीचे शासन परिपत्रक रद्द (Cancel) करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे:-

**शासन परिपत्रक :-**

०१. भूखंडाचा विकास करताना गौण खनिजाच्या उत्खननाबाबत परवानगी देण्याबाबत अनुसरावयाची कार्यपध्दतीबाबत संदर्भाधीन क्रमांक ०३., दिनांक ०९.०५.२०२३ अन्वये निर्गमित करण्यात आलेले शासन परिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

०२. विविध प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनी दिलेले निर्देश विचारात घेवून, मा. न्यायालयांनी दिलेल्या न्याय निर्णयाचा आदर राखून आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून होणारी संभाव्य दंडात्मक कारवाई, महसूलाचे नुकसान होवू नये व त्यातून उद्भवणारे वाद टाळण्यासाठी पारदर्शक व वास्तववादी कार्यपद्धती निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ४६ अन्वये नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम किंवा भूखंड विकासाची परवानगी मिळाल्यानंतर भूखंडाचा विकास करताना त्यामधील गौण खनिजाचे उत्खनन किंवा वाहतूक करण्यासाठी नव्याने सुस्पष्ट शासन निर्णय/शासन परिपत्रक निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७०९१८११५७१९१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने

MANISHA K JAYBHAYE

Digitally signed by MANISHA K JAYBHAYE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=01343097b2445ecf81676f921be86528e4e82e29792fd17cca89302f5fd01ef6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3B4284299520D55C5401385D853BB77E465E2E417BCFDDF3EBB6235BB48DEEFA, cn=MANISHA K JAYBHAYE
Date: 2026.07.09 18:13:45 +05'30'

**( मनिषा जायभाये )**
**सह सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
४. मा.उप मुख्यमंत्री (उत्पादन शुल्क, युवक व कल्याण), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा. विधानसभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
६. मा. विधानपरिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
७. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मा. मंत्री/मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
९. सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य
१०. सर्व मंत्रालयीन विभाग
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक
१४. सर्व उपविभागीय अधिकारी
१५. सर्व तहसिलदार
१६. निवडनस्ती (ख-२ कार्यासन)